THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 28TH AUGUST 1890.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

हिंदुस्तानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आलीजनाब गव्हर्नर जनरल साहेब बहादुर यांनीं तारीख ३१ जुलै सन १८९० रोजीं मंजूर केला तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं प्रसिद्ध केला असे:—

### सन १८९० चा आक्ट १४ वा.

**सन १८८६ च्या पिट्रोलियम आक्टाचें परिशिष्ट सुधारण्याविषयीं आक्ट.**

ज्या अर्थी सन १८८६ च्या पिट्रोलियम आक्टाच्या परिशिष्टाच्या ३ ऱ्या भागांतील पारिग्राफ् ४ था ( **तपासणी करणें** ) याच्या रकमा सुधारणें योग्य आहे; त्या अर्थी या आक्टावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविलें आहे :—

सन १८८६ च्या १२ व्या आक्टाच्या परिशिष्टाची सुधारणूक.

१. सदर्हू पारिग्राफाची तिसरी व चवथी या रकमा ह्मणजे ज्यांच्या आरंभीं अनुक्रमें "जर फारेन्हैट ७७ अंश उष्णतेच्या मानाखालीं चमक येईल" आणि "ज्या उष्णतामानाला तपासणी सुरू केली असेल त्यानंतर आठ अंशांच्या आंत आलेली कोणतीहि चमक" हे शब्द आहेत त्या रकमांच्या ऐवजीं खालीं सांगितलेल्या रकमा दाखल कराव्या, ह्मणजे :

"जर फारन्हैट ७७ अंश उष्णतामानाखालीं चमक येईल, तर ज्या उष्णतामानाला ती आली असेल तें मान टिपून ठेविलें पाहिजे. मासल्यापैकीं लागोपाठ दोन नवीन भागांची तपासणी तशाच रीतीनें करावी व परिणाम टिपून ठेवावे. याप्रमाणें टिपलेल्या तीन परिणामांपैकीं कोणत्याहि दोहोंमध्यें जर फारेन्हैट २ अंशांहून अधिक नाहीं इतका फरक असला तर, व जर, ज्या उष्णतामानाला तपासणी सुरू केली असेल त्यानंतर आठ अंशांच्या आंत सदर्हू कोणत्याहि मासल्यास चमक आली नसेल, तर पुढें सांगितल्याप्रमाणें प्रत्येक परिणाम हवेच्या दाबाबदल दुरुस्त केला पाहिजे, आणि दुरुस्त केलेल्या तिन्ही परिणामांची सरासरी येईल ती अशा मासल्याचा ज्वलनबिंदु समजावा. अशा परिणामांपैकीं कोणत्याहि दोहोंमध्यें फारेन्हैटच्या २ अंशांहून अधिक फरक असून, ज्या उष्णतामानाला तपासणी सुरू केली असेल त्यानंतर आठ अंशांच्या आंत सदर्हू कोणत्याहि मासल्यास चमक आली नसेल त्या प्रसंगीं त्या सर्व तपासण्या रद्द करून नवीन

तीन तपासण्या वरीलप्रमाणें कराव्या, आणि पुरेसा मेळ पडेपर्यंत याप्रमाणेंच करावें, व असा मेळ पडला ह्मणजे परिणाम दुरुस्त करावे आणि सदरीं सांगितलेल्या रीतीनें सरासरी काढावी.

परंतु जर वर सांगितलेल्या रीतीनें तपासणी केली असेल तेव्हां ६४ अंशांला अगर त्यांखालीं चमक आली, तर ज्या उष्णतामानाला ही पहिली चमक निघाली त्याहून दहा अंश कमी उष्णतामानाला दुसरी तपासणी सुरू केली पाहिजे ( ह्मणजे ५४ अगर त्यांहून कमी अंशांला ), आणि लागोपाठ केलेल्या तीन तपासण्यांच्या परिणामांत २ अंशांहून जास्त फरक न होई तोंपर्यंत व ज्या उष्णतामानाला तपासणी सुरू केली असेल त्यानंतर आठ अंशांच्या आंत त्या तीन तपासण्यांपैकीं कोणत्याहि तपासणींत चमक आली नसेल तोंपर्यंत सदरीलप्रमाणें तपासणी करीत असावें: मात्र नेहमी असें समजावें कीं जर सदर्हू तपासण्यांच्या सुरुवातीसच, प्रथमतः ५६ अंशांला तपासण्याच्या दिव्याची ज्योत लाविली असतां, चमक येईल तर, व तसेंच जर त्यानंतर लागोपाठ केलेल्या तीन तपासण्यांतून प्रत्येक तपासणींत वर फर्माविल्याप्रमाणें प्रथमतः ४६ अंशांला तपासण्याच्या दिव्याची ज्योत लाविली असून त्याप्रत्येक तपासणींतहि, ती ज्योत पहिल्यानें लावितांच, चमक आली तर, त्या पिट्रोलियमचा ज्वलनबिंदु ४७ अंशांखालीं आहे असा दाखला तपासणी करणाऱ्या अमलदारानें दिला पाहिजे, आणि तो मासला भयकारक आहे असा रिपोर्ट केला पाहिजे."

(True Translation.)

Y. M. KELKAR,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS